ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारी प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख ६ जानेवारी, १९६० | अंक १

## "अर्था"चें अभिनंदन

कोणत्याहि जनसत्ताक राज्यविधानाचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे चालू घडामोडींविषयीं समंजसपणा व देशापुढील योजना व ध्येय यांसंबंधीं सबोध उत्साह. हे आधारस्तंभ बळकट करण्याची जबाबदारी विशेषतः वृत्तपत्रांवर असते. सर्वसाधारण समाजाला आर्थिक घडामोडी ह्या स्वभावतःच दुर्बोध असत व सध्यांच्या गुंतागुंतीच्या घडामोडींची अंतःप्रवणता समजणें त्याला विशेष कठीण असतें, त्या समजून घेण्यांत त्यांना साहाय्य देणें हें आपल्या "अर्थ" या साप्ताहिकाचें कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. "अर्थ" ही कामगिरी फार उत्कृष्ट रीतीनें बजावीत आहे असें मी स्वानुभवावरून दृढविश्वासानें सांगूं शकतों. योग्य तें लोकसाहाय्य मिळून "अर्था"ची ही कामगिरी अव्याहत प्रभावीपणानें चालो.

—चिं. द्वा. देशमुख

★

"अर्था" चा पहिला अंक प्रसिद्ध झाला त्यावेळीं प्रो. काळे स्वतः पाटणा येथें अर्थशास्त्रपरिषदेमध्यें उपस्थित होते. सर्व सहकारी मित्रांना प्रो. काळे हे मराठीमध्यें अर्थविषयक साप्ताहिक काढीत आहेत. ह्या घटनेनें एक प्रकारचें उत्तेजन वाटत होतें. मंदी थोडीबहुत हाटत चालली होती, आणि गोलमेज परिषदेच्या घटनेमुळें भविष्यकाळाबद्दल आशायुक्त वातावरण निर्माण झालें होतें. अशावेळीं सर्व देशांत औद्योगीकरण, व्यापार, शेतीसुधारणा, सहकार इत्यादि विषयांबद्दल साधार व सशास्त्र माहितीचा सामान्य लोकांत प्रसार व्हावा ही गोष्ट सर्वांसच इष्ट वाटत होती. परंतु फार तर दुसऱ्या एखाद्या नियतकालिकाला पुरवणी म्हणून अर्थव्यवहाराबद्दल विवेचन होणें शक्य आहे, स्वतंत्र साप्ताहिक शुष्क अर्थशास्त्रीय चर्चेचें साधन म्हणून काढल्यास चालणें दुरापास्त आहे, असेंच सर्वांस वाटत होतें.

साप्ताहिकाच्या खर्चाची गोष्ट सोडली तरी आठवड्यामागून आठवडे चांगल्या दर्जाचा मजकूर तरी कसा तयार ठेवावयाचा ह्याबद्दलहि चिंता वाटत होती. परंतु प्रो. काळे ह्यांनीं निदान महाराष्ट्रापुरती तरी ही गरज भागविण्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली आणि तेव्हांपासून दहा वर्षें दुसऱ्या कोणत्याहि कामापेक्षा "अर्था" च्या कामाला अधिक महत्त्व देऊन त्याची उपयुक्तता वाढविण्याचा सतत प्रयत्न केला. ह्या कामीं आर्यभूषण छापखान्याचे संचालक श्री. वामनराव पटवर्धन ह्यांनींहि प्रो. काळे ह्यांच्या नवीन उपक्रमाचें महत्त्व ओळखून मनःपूर्वक साहाय्य केलें.

"अर्था" चा ग्राहकवर्ग निवडक व बहुतेक संस्थांशीं संलग्न, असा असे. त्यामुळें ग्राहकसंख्येपेक्षा वाचकसंख्या अनेक पटींनीं मोठी असे. प्रत्यक्ष व्यवहारांना उपयुक्त अशी माहिती "अर्था"त पुष्कळ असे. त्याचप्रमाणें चालू आर्थिक घडामोडींबद्दल विद्वान संपादकांचें मार्गदर्शन होत असल्यानें माहितीपूर्ण व तज्ज्ञ वातावरण निरनिराळ्या गटांत निर्माण होण्यास मदत झाली. महाराष्ट्राच्या शेतकी, ग्रामीण, सहकारी, औद्योगिक व व्यापारी जीवनांत अगदीं खालच्या थरापासून एक प्रगतीमय परिवर्तन गेल्या वीस-पंचवीस वर्षांत घडून येत आहे. महाराष्ट्राच्या ह्या औद्योगिक क्रांतीचे एक प्रमुख जनक व मंत्रदाते ह्या नात्यानें प्रो. काळे ह्यांनीं फार मोठें कार्य केलें. त्याच कार्याचें प्रमुख अंग व मुखपत्र ही "अर्था"ची भूमिका होती.

प्रो. काळे ह्यांनीं आयुष्यभर "अर्था" ला पूर्णपणें वाहून घेतले होते. त्यांची विद्वत्ता, कर्तृत्व व अनेक क्षेत्रांतील स्नेहसंबंध ह्यांमुळें त्यांना आपलीं इतर महत्त्वाचीं व दगदगीचीं कामें सांभाळूनहि "अर्थ"संपादनाचें काम करतां आलें. परंतु त्यांच्यामागें गेलीं पंधरा वर्षें त्यांचे चिरंजीव श्रीपादराव ऊर्फ नानासाहेब ह्यांनीं ज्या निष्ठेनें व सव्यसाची कर्तबगारीनें अर्थ-साप्ताहिकाचें काम चालूं ठेवलें आहे त्याबद्दल महाराष्ट्र त्यांचा ऋणी आहे. नव्या महाराष्ट्रनिर्मितीनंतर आपणामध्यें एक नवें युग सुरू होणार आहे. त्याचा उपयोग सामान्य जनतेची, व विशेषतः बहुजन समाजाची, आर्थिक स्थिति सुधारण्यास व्हावयाचा असेल तर आर्थिक माहिती व अर्थव्यवहार ह्याबद्दल सशास्त्र विवेचन ह्यांचा प्रवाह सर्व साक्षर नागरिकांपर्यंत पोहोंचला पाहिजे. गेल्या पंचवीस वर्षें नियमितपणें आर्थिक विषयासंबंधीं लोकशिक्षणाचें कार्य पार पाडल्याबद्दल संपादकांचें अभिनंदन करणें योग्य आहे. पुढील अधिक प्रगतीमय काळांत महाराष्ट्राच्या औद्योगिक वाढीस "अर्था"चें असें साहाय्य व मार्गदर्शन होवो अशी ह्या शुभप्रसंगीं सर्व महाराष्ट्रीयांची इच्छा असणार.

—द. गो. कर्वे

## "अर्था" चें अभिनंदन

न्यायमूर्ति रानड्यांचे शिष्य व निस्सीम अनुयायी, भारतांतील सुविख्यात व कर्तबगार अर्थशास्त्र प्राध्यापक वा. गो. काळे यांनीं "अर्थ" या साप्ताहिकास सुरुवात करून २५ वर्षे पुरीं होत आहेत. सुरुवातीस कांहीं काळ सुद्धां कै. वामनरावजींचें नेतृत्व अर्थास लाभलें. त्यांच्या निधना-नंतर, आजपावेतों, त्यांचे चिरंजीव श्री. श्री. वा. काळे यांनीं अत्यंत निष्ठेनें "अर्थ" चालविला आहे. केवळ अर्थविषयक प्रश्नांची चर्चा करणारें व माहिती देणारें साप्ताहिक मराठींत २५ वर्षे सातत्यानें प्रसिद्ध होत राहते हीच गोष्ट कौतुकाची मानली पाहिजे; याचें सर्व श्रेय श्री. श्रीपादरावांची निष्ठा व चिकाटी या गुणांबरोबरच त्यांचें कौशल्य व योजकता यासहि दिलें पाहिजे. मराठी वृत्तपत्रीय सृष्टींत अर्थानें आजवर जी विशिष्टपूर्ण कामगिरी बजावली ती "अर्थ" चिरकाल वाढत्या सुकीर्तिपूर्वक बजावीत राहो हीच या प्रसंगीं इच्छा.

—ध. रा. गाडगीळ

★

महाराष्ट्रांतील नियतकालिकांत राजकीय, सामाजिक अथवा ललित साहित्याला वाहिलेल्या वर्तमानपत्रांची व मासिकांची संख्याच फार मोठी आहे. त्या मानानें आर्थिक विषयाचा ऊहापोह करणारीं पत्रें क्वचितच आढळतात. याचें कारण उघड आहे. अशा पत्राचें संपादन करण्यास फार अभ्यास व परिश्रम लागतात आणि प्रसाराला वाव मात्र अगदीं बेताचा.

अशी वस्तुस्थिति असतां गेलीं २५ वर्षे चुकूनहि खंड पडूं न देतां "अर्थ" सारखें एक उत्कृष्ट साप्ताहिक आपल्या वडिलांच्या थोर परंपरेला शोभेल असें चालवून श्री. श्रीपादराव काळे यांनीं महाराष्ट्राची जी सेवा केली आहे, तिचें मोल खचित फार मोठें ठरेल. यापुढें तर महाराष्ट्राचा आर्थिक विकास शीघ्रतेनें घडवून आणण्या-वरच आपणांस सर्व लक्ष केंद्रित करावयाचें असल्यानें "अर्था"ची उपयुक्ततांहि उत्तरोत्तर वाढत जाणार हें निश्चित. ती महत्त्वाची कामगिरी पार पाडण्यास त्याला दीर्घायुष्य व सामर्थ्य प्राप्त होवो.

—शं. वा. किर्लोस्कर

"अर्थ" साप्ताहिकास ह्या अंकापासून २६ वें वर्ष लागत आहे. २ जानेवारी, १९३५ रोजीं "अर्था" चा पहिला अंक प्रसिद्ध झाला, त्यांत "अर्था" च्या संस्थापकांनीं हें साप्ताहिक स्थापन करण्याचा उद्देश विशद केला. त्या धोरणानें हें साप्ताहिक आजवर चाल-विण्यांत आलें आहे. ह्या कामीं कितीतरी जणांचें हार्दिक साहाय्य संपादकांना लाभलेलें आहे. त्यामुळेंच "अर्थ" ही प्रगति करूं शकला आहे; त्या सर्वांचा मी ऋणी आहें.

— संपादक

## "अर्था" चें अभिनंदन

सन १९३५ सालीं प्रा. वामनरावजी काळे यांनीं 'अर्थ' साप्ताहिकास सुरुवात केली. ७-८ वर्षे त्यांनीं आणि पुढें त्यांचें सुविद्य चिरंजीव श्री. श्रीपादराव काळे यांनीं हें साप्ताहिक चालवून आज रौप्यमहोत्सवाचा भाग्याचा दिवस येत आहे. हें साप्ताहिक आर्यभूषण मुद्रणालयांत मुद्रित केलें जातें व त्यामुळें त्याच्या जन्मापासून आज सतत २५ वर्षे माझा जुळणीस म्हणून या पत्राशीं सतत परिचय आहे. आम्हां कामगारांच्या अडीअडचणी ध्यानांत घेऊन उभयता वामनरावजी व श्रीपादराव यांनीं सौजन्यानें व सहानुभूतीनें आमचेकडून काम करून घेतलें. जाहिरातींची व मजकुरांची सजावट आम्हांस त्यांनीं समजावून देऊन करून घेतली व अर्थाचा दर्जा कायम राखला.

"अर्थ" साप्ताहिकांतील विषयांचें मला ज्ञान अवगत नसल्यानें मी त्याबाबत काय सांगणार! परंतु कांहीं अवघड प्रसंगीं श्री. काळे यांचा सल्ला अचूक मिळत असे. त्यांच्या सौजन्यपूर्ण वागण्यानें व अडचणींना धीरानें तोंड दिल्यानेंच आजचा हा सौभाग्याचा दिवस उजाडत आहे. 'अर्थाची' अशीच भरभराट होवो हीच इच्छा!

म. वि. पाटील
जुळणी-खात्यातर्फे

## एक आण्याचीं व अर्ध्या आण्याचीं पिवळीं नाणीं

१ जानेवारी, १९६० पासून निकेल-पितळ मिश्रित एक आण्याचीं सर्व पिवळीं नाणीं कायदेशीर चलन म्हणून रद्द झालीं आहेत. तथापि, हीं नाणीं ३० जून १९६० ला संपणाऱ्या सहा महिनेपर्यंत रिझर्व्ह बँकेच्या सर्व कचेऱ्यांत, सरकारी आर्थिक व्यवहार पाहणाऱ्या या बँकेच्या सर्व एजन्सी बँकांत आणि सरकारी ट्रेझरी व सब ट्रेझरींत स्वीकारण्यांत येतील. या मुदतींत मागील पैसे घेण्यासाठी रेल्वे कचेऱ्या आणि टपाल कचेऱ्या यांजकडून हीं नाणीं स्वीकारण्यांत येतील. या सहा महिन्यानंतरहि पुढील सूचना मिळेपर्यंत हीं दोन्हीं नाणीं रिझर्व्ह बँकेच्या इश्यू डिपार्टमेण्टच्या कचेऱ्यांकडून स्वीकारण्यांत येतील.

## चहाची सहकारी योजना रद्द केली

कांग्रा जिल्ह्यांतील चहाचे मळे सहकारी तत्त्वावर संघटित करण्याची आपली योजना पंजाब सरकारनें रद्द केली आहे. मळेवाले आणि कामगार ह्या दोघांनींहि योजनेला विरोध केला.

———

## बनावट पासपोर्ट प्रकरणीं प्राध्यापकाला अटक

जालंदर येथील जोगेंद्रसिंग नांवाच्या प्राध्यापकाला अटक करण्यांत आली आहे. एका सेहुताला बनावट पासपोर्ट मिळवून देण्याच्या कामीं त्यानें ३,००० रुपये घेतले, असा त्याचेवर आरोप आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ६ जानेवारी, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


# आर्थिक लोकजागृति आणि आर्थिक व्यवहाराचें लोकशिक्षण

( " अर्था " चा उद्देश स्पष्ट करणारें २-१-१९३५ च्या, पहिल्या अंकांतील संपादकीय )

## अर्थ-योग

" तस्मान्नित्योत्थितो राजा कुर्यादर्थानुशासनम् ।
अर्थस्य मूलमुत्थानमनर्थस्य विपर्ययः ॥
अनुत्थाने ध्रुवो नाशः प्राप्तस्यानागतस्य च ।
प्राप्यते फलमुत्थानाल्लभते चार्थसंपदम् ॥

—कौटिलीय अर्थशास्त्र.

( म्हणून, राजानें नित्य उद्योग करून अर्थसाधन करावें. उद्योग हा अर्थप्राप्तीचें मूळ आहे; आणि उलट उद्योगाचा अभाव अनर्थास कारणीभूत होतो. हातून उद्योग न झाल्यास जवळ असलेल्या व पुढें मिळावयाच्या संपत्तीचा नाश निश्चित आहे. उद्योगानें फलप्राप्ति होऊन भरपूर संपत्ति मिळते. )

कोणत्याहि समाजाची किंवा राष्ट्राची सुस्थिति त्याच्या अनेकांगी समकालीन उन्नतीवर अवलंबून असते. समृद्ध राष्ट्रांत विद्या, कला, नीति, उद्योग, व्यापार व राज्यकारभार हीं सर्व अंगें सुदृढ असतात आणि कोणत्याहि समाजांत ह्यांपैकी कांहीं अंगांची अमर्याद वाढ किंवा जोपासना झाल्यास अथवा कांहींची विशेष अनास्था झाल्यास त्या समाजाची अवनति व नाश हीं क्रमप्राप्तच असतात असा मानवी जीवनाच्या इतिहासाचा एक महत्त्वाचा सिद्धान्त दिसतो. राजकीय, सामाजिक, औद्योगिक, बौद्धिक वगैरे सर्व बाजूनीं एकसमयावच्छेदेंकरून देशाची प्रगति झाली पाहिजे अशी इच्छा हिंदुस्थानांत अलीकडे दृढतर होत चालली आहे, ह्याचें मुख्य कारण वरील सिद्धान्ताची वाढती जिवंत जाणीव हें होय राष्ट्रोन्नतीचें ध्येय जिंकण्यास, राजकारण, व्यापार-धंद्यांची जोपासना, समाजसुधारणा आणि नीतिसंवर्धन ह्यांची चतुरंगसेना उद्योग-समरांगणांत सिद्ध असावयास पाहिजे. हें तत्त्व पाश्चात्य विद्वानांस संमत असून, सर्व प्रमुख राष्ट्रांतील पुढारी त्याचें आचरण करीत आहेत. वरील साधनें कार्यक्षम व्हावीं एवढ्यासाठीं समाजांतील निरनिराळ्या वर्गांस त्यांचें ज्ञान आणि अनुभव प्राप्त करून देणें आवश्यक असतें. शिकावयाच्या विद्यांची संख्या काय आहे ह्या संबंधानें निर्णय देतांना, विद्या एकच आहे, त्या दोन आहेत व त्या तीन आहेत हीं भिन्नभिन्न विद्वन्मतें अग्राह्य ठरवून त्या चार आहेत आणि त्या म्हणजे तत्त्वज्ञान, वेद, अर्थशास्त्र व राजकारणशास्त्र ह्या होत असा स्वतःचा ठाम सिद्धान्त चाणक्यानें आपल्या ' अर्थशास्त्र ' ह्या ग्रंथांत मांडला आहे, ह्याचें कारण वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

समाजहित, नीतिधर्म व राजकारण ह्यांकडे न पाहतां ऐहिक सुखाच्यामागें प्रत्येक व्यक्तीनें लागावें, म्हणजे सर्व मानवजातीचें हित अनायासें साधतें अशी अर्थशास्त्राची वास्तविक शिकवण नाहीं. असल्या मतांचा एका काळीं प्रसार झाला होता हें खरें आहे. परंतु व्यक्तिहिताऐवजीं राष्ट्रहिताला प्राधान्य मिळून समाजाचा घटकावयव ह्या नात्यानेंच व्यक्तीचें महत्त्व आहे ह्या विचारसरणीचें प्राबल्य आतां पाश्चात्य पंडितांच्या लिखाणांतहि व्यक्त होत आहे. समाजाचें व राष्ट्राचें उन्नतीचें ध्येय साधण्यास आवश्यक असलेल्या योग्य साधनांचा विचार करणारें शास्त्र अशी अर्थशास्त्राची व्याख्या एका पाश्चात्य विद्वानानें केली आहे ती लक्षांत ठेवण्यासारखी आहे. धर्म, अर्थ आणि काम हीं परस्परावलंबी आहेत तरी अर्थावांचून धर्म व काम असाध्य असल्यामुळें कौटिल्यानें अर्थास प्राधान्य दिलें आहे त्याचेंहि रहस्य हेंच आहे. निसर्गांत असलेल्या शक्तींचा आपल्या बुद्धीच्या बलानें उपयोग करून आपली शारीरिक, मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक उन्नति करून घेणें हें राष्ट्राच्या संस्कृतीचें ध्येय होय, आणि अर्थोपासना हा तें ध्येय गांठण्याचा मार्ग आहे. शेती, उद्योगधंदे, व्यापार, इत्यादि व्यवहार हीं अर्थार्जनाचीं साधनें असून त्यांच्या योग्य संघटनेवर व कार्यक्षमतेवर समाजाची सुस्थिति अवलंबून राहणें अपरिहार्य आहे. ह्याकरितां राष्ट्राचें नेतृत्व ज्यांच्या हातीं आहे अशा लोकांनीं जनतेस योग्य शिक्षण देऊन सर्वांच्या अंगीं कार्यक्षमता उत्पन्न केली पाहिजे. मानवजातीच्या संघटनेंत राष्ट्र हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे असें केवळ तात्त्विक रीतीनेंच नव्हे तर प्रत्यक्ष व्यवहारांतहि मानण्यांत येतें, आणि राष्ट्रांचे परस्पर संबंध, स्वातंत्र्य आणि सहकारिता ह्यांच्या आधारावर निश्चित करण्यांत येतात. अशा स्थितींत हिंदी राष्ट्रानें स्वतःची उन्नति करून इतर राष्ट्रांच्या बरोबरीनें सर्व मानवजातीची उन्नति साधावी हें उचित आहे.

उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या बाबतींत पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य असावें, स्पर्धेस अनियंत्रित वाव मिळावा आणि राज्यकर्त्यांनीं परराष्ट्रीय व्यापारास आपल्या देशाचें दार उघडें ठेवावें व आर्थिक व्यवहारांत कोणतीहि ढवळाढवळ करूं नये असा दंडक प्रत्यक्ष आचरणांत नाहीं तरी तत्त्वतः कमी-अधिक प्रमाणांत जगभर सर्वत्र गेल्या शतकांत मान्यता पावला होता. हें पारडें आतां फिरलें असून राष्ट्रीय स्वयंसिद्धतेचा सिद्धान्त चोहोंकडे जोरावत आहे. रशियापासून अमेरिकेपर्यंत सर्वच राष्ट्रें महायुद्धामुळें बदललेल्या आर्थिक परिस्थितीस तोंड देण्यासाठीं आपल्या राज्यकर्त्यांमार्फत स्वतःच्या उद्योगधंद्यांस व व्यापारास योग्य योजना आंखून त्याप्रमाणें इष्ट वळण देत आहेत. ह्यापुढें जगाची आर्थिक घटना ह्या राष्ट्रीय स्वयंसिद्धतेच्या पायावरच उभी रहावयाची आहे. प्रस्तुत लेखाच्या शिरोभागीं कौटिल्याच्या अर्थशास्त्रांतील वचन उद्धृत केलें आहे, त्यांत प्रजेचें हित तेंच राजाचें हित असल्यानें, राजानें उद्योग करून अर्थसंपादन करावें असें म्हटलें आहे, त्याचाच प्रतिध्वनि सध्या, वर सांगितल्याप्रमाणें, पाश्चात्य राष्ट्रांत

उमटत आहे हा एक विलक्षण योगायोग आहे. लोकांचे प्रतिनिधि आणि हितकर्ते जें सरकार, त्यानें राष्ट्रीय उद्योगधंद्यांस हेतुपूर्वक उत्तेजन द्यावें ही जी हिंदी जनतेची मागणी आहे ती इतर देशांत आतां संमत झालेल्या धोरणास सर्वस्वी धरून आहे. इंग्लंडमधील कोत्या बुद्धीचे स्वार्थसाधु कारखानदार आणि व्यापारी हिंदुस्थान सरकारास 'जकातीचें स्वातंत्र्य' देण्यास तयार नसून त्यावर मळतेच निर्बंध घालूं पाहत आहेत. ह्याबद्दल हिंदुस्थानांत चोहोंकडे निषेध प्रदर्शित होत आहे तो वावगा आहे असें कोण म्हणेल? खुल्या व्यापाराचें, आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्याचें आणि अनियंत्रित स्पर्धेचें माहेरघर जें ब्रिटिश राष्ट्र, त्यांतहि औद्योगिक संरक्षणाच्या पद्धतीचा उपक्रम झाला असतां हिंदुस्थानास व्यापारी स्वयं-निर्णयाच्या बाबतींतला हक्क नाकारणें न्यायाचें कसें होईल? ह्यापुढें सर्वत्र आंतरराष्ट्रीय व्यापार राष्ट्रीय सरकारांच्या दरम्यान होणाऱ्या करारांप्रमाणें चालावयाचा असल्यानें त्याच धोरणास अनुसरून हिंदुस्थानांतील लोकमतास मान देण्यांत ग्रेट ब्रिटनचें व ह्या देशाचें सारखेंच हित आहे ही गोष्ट ब्रिटिश मुत्सद्यांनीं लक्षांत ठेवणें आवश्यक आहे.

हिंदी शेती, व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचा विकास झाल्या-वांचून जनतेची आर्थिक स्थिति सुधारणें अशक्य आहे हें आतां सर्वमान्य झालें आहे. ह्या कामीं सेठीशाही कार्यक्षम आर्थिक पद्धति आणि संघटना ह्यांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होणें इष्ट आहे; त्याचप्रमाणें लहानमोठ्या गांवांतून आणि शहरांतून आर्थिक बुद्धि जागृत झाली पाहिजे. महाराष्ट्रांत तर ह्या अर्थ योगाचें महत्त्व विशेष आहे. गेल्या दोन पिढ्या महाराष्ट्रीयांनीं हिंदुस्थानच्या सार्वजनिक चळवळींत पुढाकार घेऊन हिंदी संस्कृति व प्रगति ह्यांस नवीन वळण लावण्याचा मान मिळविला आहे. हें स्थान महाराष्ट्रीयांस टिकवावयाचें असेल तर आर्थिक दुर्बलतेचें आपणांत असलेलें वैगुण्य त्यांनी काढून टाकलें पाहिजे. दीर्घोद्योग आणि योग्य संघटना ह्यांच्या साहाय्यानें अर्थयोग त्यांनीं अंगीं बाणवला पाहिजे. आमच्या समाजास साहित्य, संगीत, कला ह्यांची जशी आवश्यकता आहे तशीच उद्योगधंद्यांची व व्यापाराचीहि आहे; किंबहुना, आजच्या परिस्थितींत आर्थिक व्यवहारांतील नैपुण्याची जरूर जास्त आहे, ही गोष्ट सर्वमान्य होण्यासारखी आहे किंवा झालीहि आहे. तथापि, महाराष्ट्राची अर्थविषयक प्रवृत्ति अत्यंत दुर्बळ असल्यानें ह्या संबंधाच्या कल्पनांचा व वाङ्मयाचा महाराष्ट्रांत अभावच आहे असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. सामाजिक संस्कृतींत ललितवाङ्मयास जसें स्थान आहे त्याच तोडीचें स्थान अर्थविषयक वाङ्मयास प्राप्त होणें अगत्याचें आहे आणि ही उणीव भरून काढण्याचें साहस ह्या साप्ताहिकाच्या द्वारें आम्ही करीत आहों. बँकिंग, परराष्ट्रीय व्यापार, उद्योगधंदे, चलन, हुंडणावळ, जकाती, आर्थिक घटना, यांत्रिक सुधारणा ह्यांच्या बाबतींत विलक्षण घडामोड व उलथापालथ जगांत चालली आहे, आणि त्यांत प्रत्यक्ष भाग घेणें तर राहो, पण त्यांची माहिती माणसें असणारीं महाराष्ट्रीय समाजांत—सुशिक्षित वर्ग धरूनहि—किती सांपडतील? हा दोष नाहींसा करण्याचा एक मार्ग म्हणजे अर्थविषयक वाङ्मय निर्माण करून सामान्य जनतेसहि त्याचा फायदा घेतां यावा अशी योजना करणें हा होय. आर्थिक लोकजागृति आणि आर्थिक व्यवहारांचें लोकशिक्षण हाच आमच्या प्रयत्नाचा मुख्य उद्देश आहे.

ह्या उद्योगास आम्हीं साहस असें म्हटलें आहे ह्याचें कारण त्या कामीं अंगावर येणारी विशेष जबाबदारी हें होय. मागणीस अनुसरून पुरवठा होतो व करावा हा आर्थिक नियम सर्वश्रुत आहे. त्यास प्रस्तुत उपक्रम अपवादात्मकसा आहे असें दिसेल. परंतु येथें दुसरें एक आर्थिक तत्त्व लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. लोकांस काय पथ्यकर आहे हें जाणून, शिक्षणाच्या साहाय्यानें गरजांस नवीन वळण लावतां येणें शक्य होतें, आणि योग्य वस्तूचा, पद्धतशीर पुरवठा झाला असतां नवीन मागणी निर्माण करतां येते. शिवाय ही सार्वजनिक हिताची व निकडीची बाब असल्यानें तिच्या संबंधांत महाराष्ट्रीय जनतेकडून योग्य उत्तेजन आणि साहाय्य मिळेल असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे. कारखानदार, व्यापारी, व सर्वसामान्य सुशिक्षित जनता ह्यांचा आश्रय मिळेल त्या मानानें साप्ताहिकाचा आकार, स्वरूप व मजकूर ह्यांत सुधारणा करणें शक्य होईल. आर्थिक प्रश्न अनेकविध, गुंतागुंतीचे व समजण्यास अवघड असे असतात म्हणून त्यासंबंधाची निवडक अशी विविध माहिती देऊन शास्त्रीय पार्श्वभूमि न सोडतां पण सुलभ भाषेंत त्यांची वेळोवेळ चर्चा करावयाची आणि जगांत व हिंदुस्थानांत चाललेल्या आर्थिक घडामोडींशीं वाचकांचा परिचय करून देऊन उद्योगधंद्यांच्या व व्यापाराच्या उन्नतीचा व्यावहारिक मार्ग त्यांस दाखवून द्यावयाचा हें 'अर्था' चें धोरण राहील. शेतकरी, जमीनदार, उद्यमी, लहान–मोठे व्यापारी, कारखानदार, भांडवलवाले, पोटापाण्याचा प्रश्न सोडवूं पाहणारे सुशिक्षित तरुण, सुखवस्तु व मध्यम स्थितींतील वर्ग, सार्वजनिक चळवळींमध्यें भाग घेणारे व घेऊं इच्छिणारे नागरिक, मराठी व इंग्रजी शाळांतील शिक्षक अशा भिन्न भिन्न व्यवसायांच्या व परिस्थितींतल्या अनेक लोकांस हें साप्ताहिक उपयुक्त होईल अशा तऱ्हेनें तें चालविण्याचा आमचा मानस आहे. औद्योगिक उत्साहाची एक मोठी लाट महाराष्ट्रावर कित्येक वर्षांमागें येऊन गेली. न्यायमूर्ति रानडे, नामजोशी, नागपूरकर, वगैरे सद्गृहस्थां-च्या प्रयत्नांस तात्पुरतें थोडें यश आलें. त्याची पुनरावृत्ति गेल्या पिढींत होऊन थोडेंबहुत भरीव कामहि झालें. स्वदेशी चळवळीचें व पैसाफंडाचें कार्य सर्वांस महशूरच आहे. अगदीं अलीकडील प्रगति तर विशेष उत्तेजनकारक आहे. नवीन धंदे काढून ते धडाडीनें व चिकाटीनें चालविण्यांत कित्येक महाराष्ट्री-यांनीं संपादिलेलें यश आतां सामान्य जनतेसहि परिचित असून त्यांचा येथें नामनिर्देश करण्याचें प्रयोजन नाहीं. लोकांमध्यें आत्मविश्वास व परस्पर-विश्वास हीं वाढत आहेत, नवीन उद्यो-गांस लागणारें भांडवल उपलब्ध होत आहे, औद्योगिक प्रदर्शनें भरत आहेत व धंदेवाले आणि व्यापारी ह्यांचें संघटन चालू आहे.

ही आर्थिक प्रगति टिकाऊ व हितप्रद होण्यास धंद्यांतली पात्रता व कार्यक्षमता, व्यापारी दानत, सचोटी, जूट आणि शिस्त ह्यांची अत्यंत आवश्यकता आहे. या बाबतींतली स्वतःची जबाबदारी व कर्तव्य ह्यांची प्रत्येक नागरिकांस चांगली जाणीव होणें जरूर व इष्ट आहे; आणि ती आर्थिक विषयांच्या ज्ञाना-वांचून व अनुभवाशिवाय होणें शक्य नाहीं. कोणताहि औद्योगिक किंवा व्यापारविषयक प्रश्न उपस्थित झाला असतां त्यासंबंधानें स्वतः योग्य मत बनविण्याची पात्रता जनतेंत उत्पन्न झाली पाहिजे आणि आर्थिक जगांत चाललेल्या घडामोडींचें स्थूल-मानाचें ज्ञान प्रत्येक नागरिकास असणें अगत्याचें आहे. आर्थिक महत्त्वाच्या बाबींची वेळोवेळ माहिती देऊन त्यांचें वारंवार सुगम्य विवेचन केल्यानें हा कार्यभाग साधतां येईल ह्या विश्वासानें आम्हीं प्रस्तुत साप्ताहिकाचा उद्योग आरंभिला आहे. आमच्या उपक्रमाचें चीज करण्याचें काम आम्ही लोकांवर सोंपवितों.

### १९५९ हें वर्ष कोणी गाजवलें ?

'टाइम' मासिकानें केलेल्या छाननींत, १९५९ ह्या वर्षी सर्वांत महत्त्व पावलेल्यांच्या यादींत प्रेसिडेंट आयसेनहोअरचें नांव पहिलें आहे. ब्रिटनचे पंतप्रधान हॅरोल्ड मॅक्मिलन, प. जर्मनीचे चॅन्सलर डॉ. ॲडेनोअर, फ्रान्सचे प्रेसिडेंट द गॉल आणि जपानचे पंतप्रधान किशि, हीं इतर नांवें त्या खालोखाल आहेत.

### मेकॅनिक महिला वरिष्ठ बँक अधिकारी बनली

युद्धकाळांत मेकॅनिकचें काम करणाऱ्या कु. नोरीन गिब्न्स ह्या बॅरिस्टर स्त्रीला लॉईड्स बँकेनें आपल्या कायदा शाखेमध्यें नेमलें आहे. बँकेच्या लंडनमधील एक्झिक्यूटर अँड ट्रस्टी खात्यांत तिची असिस्टंट लीगल अड्व्हायसर म्हणून नेमणूक झाली आहे. ह्या जागेचा दर्जा एखाद्या बँक-मॅनेजरच्या तोडीचा आहे. फ्रेंच किनाऱ्यासमोरील डार्टमथ आणि पोर्टस्मथ येथील टॉरपीडो बोटींना साहित्याचा पुरवठा करणाऱ्या बोटींत ती पहिल्या प्रतीची मेकॅनिक म्हणून काम करीत होती तिला प्रवास, साहित्य आणि पुराणवस्तुसंशोधन ह्यांचा नाद आहे.

### पंजाबमधील विजेचा दुष्काळ

पंजाबमध्यें विजेचा दुष्काळ चांगलाच जाणवूं लागला आहे. स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डानें गंगुवाल-कोटला वीज-केंद्रांतून होणाऱ्या पुरवठ्यांत ४०% कपात केली आहे. पंजाबमधील कित्येक गांवांना कदाचित् मुळींच वीज मिळणार नाहीं आणि घरोघर अंधार होईल. विजेच्या साह्यानें पाणीपुरवठा करणाऱ्या ट्यूब विहिरी आणि विजेवर चालणारे छोटे कारखाने ह्यांचेवर आपत्तीच ओढवणार आहे. चंदीगडचा पाणीपुरवठा अशा ट्यूब विहिरींवरच पूर्णतः अवलंबून आहे.

### हिंद सायकल्सचे मॅनेजिंग एजंट्स

हिंद सायकल्स लि. चे मॅनेजिंग एजंटस मेसर्स बिर्ला ब्रदर्स प्रायव्हेट लि., ह्यांनीं "कंपनीनें आपल्याला मॅनेजिंग एजन्सीच्या करारांतून मुक्त करावे आणि कंपनीचे सेक्रेटरीज अँड ट्रेझरर्स म्हणून नेमावे," असें तिला कळविलें आहे. सध्यां बिर्ला ब्रदर्स दहापेक्षा जास्त कंपन्यांचे मॅनेजिंग एजंटस आहेत, पण नव्या कंपनी कायद्याप्रमाणें १५ ऑगस्ट, १९६० नंतर त्यांना दहापेक्षा जास्त कंपन्यांचे मॅनेजिंग एजंटस रहातां येत नाहीं.


शेतीच्या मशागतीस लोखंडी बळकट नांगरच वापरा



किर्लोस्कर नांगराने नांगरट खोलवर होत असल्याने जमिनीतील तण न तण निघून पुढील मशागत करणे सुलभ जाते. आपल्या जमिनीच्या मगदुराप्रमाणें योग्य अशा नांगराची निवड करा.

किर्लोस्कर
स्थापना १८८८

सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी (द. सातारा)

STUSA KM4/59

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :-१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष
श्री. छोटालाल डी. जोशी

मुंबई शाखा:-८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ... ... | रु. ७,३०,४९० |
| खेळतें भांडवल | ... ... | रु. ५६,००,००० |

★ चालू खातें व्याज ½ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½ टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर

## कंपन्यांचीं स्वतःचीं मासिकें

### त्यांचें स्वरूप, संपादकाचीं कामें, चालकांची भूमिका

कित्येक कंपन्या स्वतःचीं मासिकें काढीत असतात. बातम्या देणाऱ्या छोट्या कागदापासून ते गुळगुळीत कागदावर छापलेल्या, सचित्र, रंगीत मासिकापर्यंत त्यांची मजल असते. कांहीं मोठ्या कंपन्या अनेक मासिकें चालवितात; शेल गटाचीं ५० पेक्षा जास्त मासिकें आहेत. कंपन्यांच्या मासिकांचा प्रसार मर्यादित असणें स्वाभाविकच आहे. कंपनीचें मासिक स्वस्तांत काढतां येईल, किंवा त्यावर अमर्याद खर्चहि करतां येईल. पृष्ठांचा आकार व संख्या, कागदाचा दर्जा, चित्रांची संख्या, वापरलेले रंग, रचनेची पद्धत, प्रसिद्धीच्या वेळा, इत्यादींवर तें अवलंबून राहील.

कंपनीचा व्याप वाढत गेला, म्हणजे व्यवस्थापकांना नोकर आणि गिऱ्हाईक ह्यांच्याशीं घनिष्ठ संबंध ठेवतां येणें कठीण होत जातें. नवे संबंध पूर्वीपेक्षा कमी सलोख्याचे, केवळ धंद्यापुरतें रहातात. कंपनीचें काम खातेवार चालतें. एका खात्यांतील नोकराचा दुसऱ्या खात्यांतील नोकराशीं कांहींच संबंध येत नाहीं; त्या सर्वांनीं मिळून काय करावयाचें आहे, हें विसरलें जातें. कंपनी म्हणतें फक्त तिचे बडे अधिकारी, असें समीकरण व्हावयास लागतें; सर्वांनीं मेळीमेळींनें, सलोख्यानें काम करण्याची ती जागा उरत नाहीं. कंपनीचें मासिक ह्या प्रवृत्तीस आळा घालूं शकतें. जन्म, विवाह, सेवानिवृत्ति, नवे नोकर, खेळ, इत्यादि-विषयीं वैयक्तिक माहिती मासिक पुरवूं शकते. कंपनीच्या वेगवेगळ्या खात्यांतील घडामोडींची माहिती देऊन, त्या सर्वांत एकसूत्रीपणा निर्माण करण्यास मासिक मदत करते. त्याचप्रमाणें, गिऱ्हाइकांना कंपनीच्या व्यवहारपद्धतीचें स्वरूप, संशोधन-पद्धति, उत्पादनपद्धति, इत्यादींची माहिती मासिकांत मिळते.

### नोकरांसाठी, कां गिऱ्हाइकांसाठी ?

नोकर आणि गिऱ्हाईक ह्या दोघांना उपयुक्त व मनोरंजक माहिती एकाच मासिकांत देतां येणें कठीण आहे. त्यामुळें मासिकाचे दोन प्रकार संभवतात. एक म्हणजे, अंतर्गत माहितीचें मासिक व दुसरें म्हणजे बाहेरील लोकांच्यासाठी मासिक. पहिल्या प्रकारचें मासिक कंपनींतच प्रसृत होतें. त्यांत नोकरांना आवश्यक अशीच मुख्यतः माहिती असते. दुसऱ्या प्रकारचें मासिक दूरदूरहि पाठवलें जातें आणि कंपनीची कीर्ति वाढविण्याचें तें काम करतें. पहिल्या व दुसऱ्या प्रकारच्या मासिकांचीं उद्दिष्टेंच वेगळीं आहेत. तेव्हां, त्यांची सरमिसळ करणें इष्ट ठरत नाहीं. तीं स्वतंत्र रीत्याच प्रसिद्धिली जायला हवीत. तें शक्य नसल्यास, एकाच मासिकांत पण दोन अगदीं स्वतंत्र भाग देण्यांत यावेत, पण ती कांहीं समाधानकारक तडजोड होऊं शकत नाहीं.

### संपादकाची भूमिका

कंपनीच्या मासिकाला एक संपादक लागतोच; तो कंपनीच्या नोकरांतून निवडतां येईल किंवा नवा नेमावा लागेल. त्याचा पगार आणि ब्लॉक, छपाई, फोटो, इत्यादींचा खर्च कंपनीला करावा लागतो. हा सर्व खर्च कंपनीला सहज परवडतो आणि तो करण्याची तिची तयारी आहे, ही गोष्ट गृहीत धरूनच मासिक चालविण्याचा निर्णय घेतला जाईल हें उघड आहे. मासिकासाठी योग्य संपादकाची निवड करण्यांत आली, म्हणजे व्यवस्थापकांवरील जबाबदारी खूपच कमी होते. इतर कांहीं महत्त्वाचीं कारणें त्याविरुद्ध असतील, तर वेगळें; पण हा संपादक मासिकांच्या बाबतींत अनुभवी पत्रकार असलेला बरा. तो स्वतः चांगला लेखक असण्याची जरूरी नाहीं; पण तो जर तज्ज्ञ असला तर उत्तमच. कांहीं उत्कृष्ट संपादकांना स्वतःला एक ओळसुद्धां लिहितां येत नाहीं; पण दुसऱ्यांनीं लिहिलेला मजकूर ते उत्तम रीतीनें तपासून प्रसिद्धीस योग्य असा करूं शकतात.

कंपनीमधील नोकरवर्गासाठी चालविलेल्या मासिकाला पत्रकार संपादक आवश्यक आहे; त्याला स्वतःला लिखाण करतां येणें जरूर आहे. नोकरवर्गाला हें मासिक वाचावेंसें वाटलें पाहिजे; संपादकानें छापण्यासाठी आलेला मजकूर आकर्षक रीतीनें सजवला पाहिजे. येईल तसा मजकूर छापणें म्हणजे मासिकाचें संपादन करणें नव्हे. ह्या उलट, बाहेरच्या प्रसिद्धीसाठी काढावयाच्या मासिकाचा संपादक पत्रकार नसलेला बरा. हें विधान चमत्कारिक वाटेल. कारण, त्या मासिकाचे बाबतींत कंपनीच्या लौकिकाचा प्रश्न असतो. पण, ह्या मासिकांत कंपनीच्या उत्पादनाची व विक्रीची तपशीलवार माहिती द्यावयाची असते आणि त्यासाठी सूक्ष्म तांत्रिक ज्ञान आवश्यक असतें; तें पत्रकाराला असण्याचा संभव नाहीं. ह्या मासिकांत तांत्रिक विषयावर लेख आणि माहिती येईल, ती वाचण्यासाठी उत्कृष्ट दर्जाचे मुद्रक मात्र हवेत. म्हणजे, त्याचा अर्थ, तांत्रिक संपादक आणि पत्रकार संपादक ह्या दोघांचीहि उणीव भासूं न देणारा तज्ज्ञ मुद्रक हवा.

### संचालक मंडळ आणि संपादक

संपादकाला मासिकाचे बाबतींत सर्व अधिकार असायला हवेत. तो कुणाच्याहि हाताखाली काम करणारा असूं नये; तो थेट संचालक मंडळाला जबाबदार असावा. संचालक मंडळानें स्वतःला 'संपादन समिति' मानूं नये. बहुतेक मासिकांसाठी संपादक मंडळें नेमलेलीं असतात, पण तीं नाममात्रच असलेलीं बरीं. ह्या मंडळानें संपादकाला सल्ला देण्याचें काम करायला हरकत नाहीं आणि धोरणावर व्यापक नजर अवश्य ठेवावी. संपादक स्वतःचीं मतें मासिकांत घुसडायला लागला किंवा वैयक्तिक हेवेदावे त्यांत प्रतिबिंबित व्हायला लागले, तर त्याला आळा बसवायलाच हवा. अशा संपादकाची तात्काळ उचलबांगडी केली पाहिजे.

कंपनीनें आपल्या मासिकाचा उपयोग नोकरांना सूचना देण्याकडे किंवा त्यांना दोष देण्याकडे कधींहि करतां कामा नये. हें मासिक ( अंतर्गत पद्धतीचें ) नोकरवर्गाचें आहे तें नोकरांनीं लिहिलेलें असावें, नोकरांसाठीच मजकूर असावा आणि नोकरांच्यासंबंधीं तो असावा. व्यवस्थापकांचे संदेश मासिकांत छापले जाऊं नयेत. मासिक हें व्यवस्थापकांचें मुखपत्र आहे, अशी भावना कदापि निर्माण होतां कामा नये.

बाहेरच्या प्रसिद्धीसाठी काढलेल्या मासिकाच्या संपादकासहि असेच अधिकार हवेत; पण त्याला कंपनींतील तज्ज्ञांचें अधिक प्रमाणांत सहकार्य आणि सल्ला आवश्यक ठरेल. ह्या तज्ज्ञांनीं मासिकासाठी लेख लिहिले, तरी संपादक त्यावर हात फिरवून ते प्रसिद्धीच्या दृष्टीनें सुधारूं शकेल, कांहीं भाग गाळूं शकेल किंवा वेगळ्या पद्धतीनें मांडील. तांत्रिक तज्ज्ञांच्यापेक्षा तज्ज्ञ संपादकाला वाचकांच्या दृष्टीनें मांडणी करण्याचें काम अधिक चांगलें असतें.

### संपादकाला पूर्ण वाव हवा

संपादकाला कंपनीमध्यें सगळीकडे वाव पाहिजे. कंपनीच्या कारभाराच्या सर्व अंगांचा परिचय तो करून देऊं शकला

पाहिजे. शाखा आणि कारखाने ह्यांत वावरण्यास त्याला मुक्तद्वार हवें; गिऱ्हाईक आणि अथवा नोकर ह्यांना ज्या गोष्टी माहीत करून देणें कंपनीच्या हिताचें आहे त्या गोष्टी प्रसृत करण्याची त्याला मुभा हवी. त्याला जेवढी जास्त माहिती कळेल, तितकें तो अधिक चांगलें लिहूं शकेल. चांगला संपादक सूचनांचें नेहेमींच स्वागत करील; तो प्रचाराचें काम करीत असला तरी मासिकाचें स्वरूप त्यानें उघड प्रचारी बनवून टाकतां कामा नये; मासिकांतील प्रत्येक शब्द कंपनीच्या संचालकांचें घोडें पुढें दामटण्यासाठी आहे, अशी संचालकांनीं भावना निर्माण करूं देऊं नये; संचालकांचा अंतस्थ हेतु वाचकांना रुचेल त्या प्रकारें लेखांच्या द्वारां साध्य करण्याचें काम संपादकानें करावयाचें असतें.

### प्रसिद्धीच्या वेळा

कंपनीचें नियतकालिक वर्षांतून, महिन्यांतून किती वेळां प्रसिद्ध व्हावें, हें त्यावर खर्च करण्याच्या रकमेवर कांहीं अंशीं अवलंबून राहील. पण तीन महिन्यांतून एकदां तरी तें प्रसिद्ध होणें जरूर आहे. वर्षांतून दोन-तीन वेळांच अंक निघाले, तर वाचकांना त्यांत गोडी वाटत नाहीं; बातम्याहि शिळ्या होतात. महिन्यांतून एकदां प्रसिद्धि उत्तम. पण, त्याचा दर्जा टिकवता आला पाहिजे. दरमहा प्रसिद्ध होणारें मासिक प्रसिद्धीची तारीख पुढें पुढें ढकलूं लागले, दोन महिन्यांचे जोडअंक निघूं लागले किंवा त्यांतील मजकूर कसातरी भरून काढलेला आहे असें वाचकास आढळलें, म्हणजे मासिकाची किंमत उरणार नाहीं आणि नोकरवर्गाला त्याबद्दल आपुलकी राहणार नाहीं. मासिकाच्या प्रसिद्धीची ठरलेली तारीख कांहीं झालें तरी कधींहि चुकतां कामा नये. ठराविक दिवशीं आपल्या हातांत मासिकाचा अंक पडेलच, अशी नोकरवर्गाला खात्री वाटली पाहिजे; ताज्या अंकाच्या प्रसिद्धीच्या तारखेची त्यानें मोठ्या अपेक्षेनें वाट पाहिली पाहिजे; तरच त्या मासिकाचें समर्थन करतां येईल. मासिकाच्या प्रसिद्धीचे तारखेनंतर संचालकमंडळाच्या अध्यक्षाचें वक्तव्य होणार आहे तें छापतां यावें म्हणून मासिकाची प्रसिद्धि कदापि लांबणीवर पडतां कामा नये.

### मासिकाचें वांटप

छापून आलेल्या मासिकाचें वांटप कसें व्हावें? पगाराबरोबर मासिकाचा अंक देण्यांत यावा, कँटीनमध्यें त्याचा गठ्ठा ठेवावा, प्रत्येक खात्यामार्फत तें वाटावें कीं प्रत्येकाला पोस्टानें धाडावें? तें मोफत दिलें जावें, का त्यासाठी वर्गणी असावी? मासिकाच्या वाटपाशीं संपादकाचा संबंध पोंचतो, ह्याचें कारण तयार केलेलें मासिक कसें वाचलें जातें, हें त्याला कळायलाच हवें. उत्तम लेख, मनोरंजक माहिती, आकर्षक चित्रें, संपादनकौशल्य, उत्कृष्ट छपाई, वेळेचा आणि पैशाचा खर्च, हीं सर्व कारणीं लागलीं पाहिजेत; नोकरवर्गावर मासिकाचा अपेक्षित, अनुकूल परिणामच व्हायला हवा. व्यवस्थापकांकडून मासिक ही भली मोठी देणगी आहे, असें नोकरांना वाटतां कामा नये; त्याचप्रमाणें न वाचलेल्या आणि कोणास नको असलेल्या प्रतींचे गठ्ठे इकडेतिकडे पडूं देतां कामा नयेत. लहान कंपनीमध्यें संपादकच स्वतः हिंडून अंक वाटूं शकेल आणि वाचकांचें मत त्याला अजमावतां येईल. कांहीं कंपन्या नोकराच्या घरच्या पत्त्यावर पोस्टानें अंक धाडणें पसंत करतात. त्यामुळें नोकरांच्या कुटुंबीयांनाहि कंपनीविषयीं माहिती मिळणें सोईचें जातें; कंपनीच्या दृष्टीनें तें हितावहच असते.

### वर्गणी असावी का?

फुकट मिळणाऱ्या मासिकापेक्षा वर्गणी देऊन घेतलेल्या मासिकाचें महत्त्व जास्त वाटतें; ह्याच्या विरुद्धहि मुद्दा मांडतां येईल. कांहीं झालें तरीं, अखेर, मासिकाची लोकप्रियता त्याच्या अंतर्गत गुणांवरच अवलंबून राहील, हें उघड आहे; मुखपृष्ठावर छापलेल्या किंमतीवर नाहीं. मासिकाला किंमत द्यावी लागली, म्हणजे त्यावर मालकी हक्काची भावना निर्माण होते; मोफत मिळणाऱ्या मासिकांची पत्रास ठेवली जात नाहीं; म्हणून थोडी तरी किंमत वसूल केली जावी असा युक्तिवाद करतां येण्याजोगा आहे. किंमत ठेवली, तर ती उत्पन्न मिळविण्यासाठी, खर्च भागविण्यासाठी असूं नये; नोकरांवर सर्वोत्कृष्ट मानसिक परिणाम होण्याच्या दृष्टीनेंच असावी. मासिकांत जाहिराती घेऊं नयेत; कारण त्यामुळें मिळणाऱ्या फायद्यापेक्षा वाचकांवर कंपनीविषयीं होणारा विपरीत परिणाम जास्त नुकसानकारक ठरतो.

[ दि सेक्रेटरी, सप्टेंबर १९५९ ]

---

**आंधळ्यांची शिरगणती**—आग्रा येथें भरविण्यांत येणाऱ्या नेत्रपरिषदेच्या अध्यक्षांनीं अशी सूचना केली आहे कीं, भारतामधील अंधांची शिरगणती करण्यांत यावी. देशांतील अंधांची संख्या नक्की अजमावण्यांत आलेली नाहीं. हें काम १९६१ च्या शिरगणतीच्या वेळीं सहज करतां येण्यासारखें आहे. त्यासाठी वेगळ्या संघटनेची गरज पडणार नाहीं असेंहि ते म्हणाले.

**योगविद्येसंबंधीं संशोधन**—मुंबई येथील सांताक्रूझ योगकेंद्रांत योगविद्येविषयीं एक प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. ह्या केंद्रांतून योगशास्त्राचें शिक्षण देण्यासाठी इंग्लंड, अमेरिका व इतर कांहीं देश ह्यांमधील विद्यार्थ्यांना तयार करण्यांत आलेलें आहे. केंद्राच्या चालकांनीं भारत सरकारला अशी विनंती केली आहे कीं, योगविद्येच्या प्रसारासाठी एक मध्यवर्ती संस्था स्थापन करण्यांत यावी.

**ज्यूविरोधी मोहिमेची लाट**—पश्चिम जर्मनींत ज्यू लोकांना विरोध करण्याची लाट उसळली आहे. ज्यू लोकांना धमक्या देणारीं घोषवाक्यें व स्वस्तिक चिन्हें कांहीं शहरांतून बऱ्याच ठिकाणीं भिंतीवर अगर रस्त्यावर पक्क्या रंगानें लिहिण्यांत येत आहेत. न्यूरेनबर्ग जवळील एका गांवीं तर कॅथॉलिक चर्चच्या दरवाजावर 'हिटलरचा विजय असो' अशीं अक्षरें लिहिण्यांत आलीं.

**अंतराळ जिंकण्याचे प्रयत्न**—१९६० मध्यें अंतराळावर विजय मिळविण्याच्या दृष्टीनें महत्त्वाचीं पावलें टाकण्यांत येतील असें भाकित एका श्रेष्ठ रशिअन शास्त्रज्ञानें केलें आहे. प्रत्यक्ष मंगळावर अग्निबाण सोडणें अवघड आहे. तथापि १९६० च्या ऑक्टोबर महिन्यांत पृथ्वी व मंगळ ह्यांच्यामधील अंतर नेहमींच्या मानानें कमी असेल ही गोष्ट उत्तेजक समजली जात आहे.

**कच्च्या फिल्मचा कारखाना**—उटकमंड येथें कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना काढण्याचा मध्यवर्ती सरकारचा विचार आहे. ह्याकामीं एका फ्रेंच कंपनीशीं वाटाघाटी पुऱ्या होत आल्या आहेत. कारखाना सार्वजनिक मालकीचा असेल प्रत्यक्ष उत्पादनास १९६२-६३ मध्यें प्रारंभ होईल.

# विविध माहिती

**रशिआंतील तेलाच्या नव्या विहिरी**—रशिआंतील व्होल्गा नदीच्या आसमंतांत तेलाच्या नव्या विहिरी खोदण्यांत येत आहेत. ह्या विहिरींवरील तेल उपसण्यासाठी बसविण्यांत येत असलेली यंत्रसामुग्री स्वयंचलित पद्धतीची असल्यानें विहिरींच्या उत्पादनावर दूर अंतरावरून नियंत्रण ठेवतां येईल. शिवाय नेहमींच्या कामाच्या पद्धतींमुळें उत्पन्न होणाऱ्या तेलापेक्षा तेलाचें उत्पादन ५ पट अधिक होईल.

**पश्चिम जर्मनींतील उद्योगपती**—पश्चिम जर्मनींतील उद्योगपती व व्यापारी ह्यांचें एक मंडळ लवकरच भारतांत येणार आहे. भारतामधील उद्योगपतींशीं संबंध जोडून हिंदमध्यें भांडवल गुंतविण्यास कितपत वाव आहे तें अजमावण्याचा मंडळाचा हेतु आहे. त्यानंतर भांडवल गुंतवणुकीसंबंधीं वाटाघाटी सुरू करण्यांत येतील.

**कष्टाळू शेतकऱ्याचें यश**—विजापूरपासून १५ मैलांवर बाबलेश्वर ह्या गांवीं श्री. शिरोळी ह्या नांवाच्या शेतकऱ्यानें शेतींत अपूर्व यश मिळविलें आहे. त्यांच्या १८ एकरांच्या जमिनीवर ते गेलीं सहा वर्षें राबत होते. त्यांनीं ह्या शेतींमधून दरसाल ३० हजार रुपये उत्पन्न काढण्यांत यश मिळविलें आहे. सध्यां त्यांचें वय ६५ वर्षांचें आहे.

**इराकच्या कामगारांना शिक्षण**—इराक व रशिया ह्यांच्या दरम्यान इराकी कामगारांना तांत्रिक शिक्षण देण्याचा करार करण्यांत आला आहे. ह्या कराराप्रमाणें बगदाद शहरांत तांत्रिक शिक्षण देणारीं १९ केंद्रें रशिआ स्थापन करणार आहे. ह्या केंद्रांतून ४ हजार इराकी कामगारांना अनेक प्रकारचें शास्त्रीय व तांत्रिक शिक्षण देण्यांत येईल.

**विद्यार्थ्यांमधील असंतोषाची मीमांसा**—यादवपूर विद्यापीठाच्या पदवीदानप्रसंगीं भाषण करतांना राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले कीं, हिंदी विद्यार्थ्यांत सध्यां जो असंतोष दिसून येत आहे त्याचें कारण त्यांना वाटणारी अशाश्वति आणि त्यांच्याशीं न जुळणारी सामाजिक परिस्थिति हें आहे. ह्या असुरक्षिततेच्या भावनेचा नाश केला पाहिजे असेंहि ते म्हणाले.

**टेलिप्रिंटर यंत्रांचा कारखाना**—भारतांत टेलिप्रिंटर यंत्र व टेलिग्राफसाठी लागणारें सामान तयार करण्याच्या दृष्टीनें ऑलिव्हेटि कंपनीतर्फे पाहणी करवून घेण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. कंपनीच्या एंजिनिअर्सनीं कारखान्याचे नकाशे काढण्यास प्रारंभहि केला आहे. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री कंपनीच पुरविणार आहे.

**पोलाद कारखान्याचा विस्तार**—भिलई येथील पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्याच्या योजना मध्यवर्ती सरकार तयार करीत आहे. ह्या कामासाठी आणखी १०० कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत. कारखाना काढतांना मुळांतच त्याच्या विस्ताराची सोय करून ठेवण्यांत आली होती. मध्य प्रदेशांतील ह्या कारखान्यामुळें अल्युमिनमचा व औषधांचा कारखाना काढणेंहि शक्य होणार आहे.

**आहार बदलण्याची आवश्यकता**—अ. भारतीय महिला संघटनेतर्फे दिल्ली येथील जागतिक शेती-प्रदर्शनांत एक आहारगृह चालविण्यांत येत आहे. ह्या आहारगृहांत प्रांतोप्रांतीचा आहार एक एक दिवस पुरविण्यांत येतो. त्याचबरोबर ठिकठिकाणचा आहार समतोल कसा राखावा ह्याबद्दल माहितीहि पुरविण्यांत येते. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेंत परिवर्तन घडवून आणण्यासाठी आहारांत शास्त्रशुद्ध बदल करण्यांत यावा असें संघटनेचें मत आहे.

**ईशान्य सरहद्दीवरील रस्ते**—भारताच्या ईशान्य सरहद्दीचा कारभार पाहणाऱ्या मंडळानें रस्ते व विमानें उतरण्याच्या पट्ट्या ह्यांच्यावर बराच खर्च करण्याचें ठरविलें आहे. चीनच्या भारतावरील आक्रमणामुळें ह्या मार्गांतील दळणवळणाच्या साधनाला एकदम महत्त्व आलें आहे. येत्या आर्थिक वर्षांत नवे रस्ते व विमानांच्या धावपट्ट्या ह्यांच्यावर ४५ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री**—भारत सरकारनें जपानच्या सहकार्यानें कापड गिरण्यांना लागणारी यंत्रसामुग्री तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. मुंबईमधील एक कंपनी जपानची मदत घेऊन कारखाना काढणार आहे. हिंदी कंपनीचें ५१ टक्के भांडवल असेल व जपानी कंपनीचें ४९ टक्के असेल.

**रशिआ व इटली ह्यांचा व्यापार**—रशिआ व इटली ह्या देशांत नवा व्यापारी करार करण्यांत आला आहे. करारांतील अटीप्रमाणें उभयतां देशांमधील व्यापारांत पुढील वर्षी २५ टक्के वाढ करण्यांत येईल. वाढ जमेस धरून दोन्ही देशांत ७·२ कोटी पौंड किंमतीच्या मालाची देवाण-घेवाण होईल.

**यंत्रचलित नांगरांचें उत्पादन**—मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई ह्यांनीं बडोदा येथें बोलतांना असें सांगितलें कीं, भारतासारख्या शेतीप्रधान देशानें यंत्रचलित नांगर व माती ढकलणारीं यंत्रें ह्यांचें उत्पादन स्वतःच करण्यास शिकलें पाहिजे. ह्या साधनांसाठी परदेशांवर अवलंबून राहाणें योग्य होणार नाहीं.

**रशिआसाठी कापडाची गिरणी**—अमेरिकेंतील कारखानदारांच्या एका संघटनेनें रशिआसाठी एक खूप मोठी कापडाची गिरणी पुरविण्याचें कंत्राट मिळविलें आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेंतील खाजगी भांडवलदारांनीं रशिआसाठी पत्करलेलें हें सर्वांत मोठें काम आहे. कापड गिरणीची किंमत सुमारें २ कोटी डॉलर्स असेल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.